bluebytes
news that matters

Sunday, July 18, 2010

**Movies and TV influence use of tobacco in India**

Publication: Bahujanratn Loknayak, Edition: Thane, Journalist: Bureau, Page No: 7, Location: Middle-Left, Width(cms): 8, Height(cms): 15, Size(sq.cms): 120

# भारतात तंबाखूच्या उपयोगातील वाढीवर चित्रपटात आणि टिव्हीचा मोठ्या प्रमाणावर परिणाम

मुंबई (प्रतिनिधी) – नुकत्याच हाती घेतलेल्या एका राष्ट्रीय पातळीवरील सर्वेक्षणानुसार तंबाखूचे वाढते सेवन हे अनेक आजार आणि मृत्यूचे मोठे कारण असून, रोजच्या टिव्ही आणि रेडिओ या माध्यमांना वापर करण्यासाठी उद्युक्त आणि त्याच्या विरोधात प्रसार करणे आवश्यक आहे. महिला तसेच पुरुषांमध्ये तंबाखू विषयी आवड निर्माण होण्याचे मुख्य कारण टिव्ही आणि रेडिओ आहेत. तंबाखूच्या वापराच्या प्रसारामध्ये वर्तमानपत्रांचा सह्योग खूप कमी दिसून आला आहे.

या अभ्यासाअनुसार मास मिडियाचा भारतातील तंबाखूच्या उपयोगात किती प्रमाणात हात आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. अभ्यासक्रमध्ये असे दिसून आले की, तंबाखूच्या विरोधात मतपरिवर्तन करणे यांना सहज शक्य आहे. या सर्वेक्षणातून समोर आलेल्या माहितीनुसार मिडिया स्वतंत्र्यपणे तंबाखू विषयक कंटेंटमध्ये बदल करुन मतपरिवर्तन करणे सहजशक्य आहे. मिडियाच्या विविध प्रकारे तंबाखूच्या उपयोगात विविध प्रकारच्या भूमिकेमुळे जाहिरात तसेच मनोरंजन क्षेत्राशी संबंधित मिडिया तंबाखू विषयी अधिक प्रमाणात जाहिरातील आणि चित्रपटांमध्ये धुम्रपानाशी संबंधित दृष्पांच्या माध्यमातून उपयोगासाठी उद्युक्त करणे सहजशक्य आहे. या विषयी अधिक माहिती देतांना सलाम बॉम्बे फाऊंडेशनच्या संचालिका पद्मिनी सोमानी यांनी सांलितले. कलाकार तसेच विविध सेलिब्रिटीज यांनी सामान्य मांणसाचे आदर्श म्हणून काम केले आहे. विशेष रुपाने ते युवकांचे रोलमॉडल बनणे अधिक पसंत करतात.